# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट
# अंक ५२ वा
# दिनांक १९/१२/२०१६ ते २४/१२/२०१६.
## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम
जावक क्रमांक /0967 दिनांक 29 DEC 2016

## भाग-१:- बदली/पदोन्नती/नेमणुक :-
### बदली :-

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/का.अ./राठोड हजर/२०१६/१०७४४ वाशिम दिनांक २०/१२/२०१६अन्वये मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक पोमसं/८-अ/स.सा.ब./२०१६ वि.बदली/का.अ./जिल्हा/९०/२०१६ दिनांक ३०/४/२०१६ अन्वये श्री. डी.बी.राठोड कार्यालय अधिक्षक यांची प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला यांचे आस्थापनेवरुन पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आस्थापनेवर बदली झाल्याने त्यांना प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला यांचे आदेश क्रमांक पो.प्रकेअ/आली-१/कार्यमुक्त/राठोड/७५४२/२०१६ दिनांक ३०/११/२०१६ अन्वये तयांना बदलीचे ठिकाणी हजर होण्यासाठी दिनांक ३०/११/२०१६ अन्वये बदलीचे ठिकाणी हजर झाले आदेश क्रमांक पोअवा/आस्था/आंजिब-हजर/पोशि-गौरवे,नायडे/१०७०२/२०१६ रोजी मा.नंतरने कार्यमुक्त केले आहे. श्री.डी.बी.राठोड कार्यालय अधिक्षक म्हणुन दिनांक १९/१२/२०१६ रोजी मा.पुर्व या आस्थापनेवर हजर झाले आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/आंजीब वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अन्वये खालील नमुद कर्मचारी यांची विनंती नुसार पोलीस अधिक्षक चंद्रपुर पोलीस दलातुन ते वाशिम जिल्हा पोलीस दलात पोलीस शिपाई पदावर आंतर जिल्हा बदली झाल्याने या आस्थापनेवर कर्तव्यावर हजर होणेकामी आले असता त्यांना दिनांक १६/१२/२०१६ रोजीचे मा.नंतर पोलीस शिपाई पदावर हजर करुन घेवुन त्यांना वाशिम जिल्हा पोलीस दलाचा बक्कल नंबर देण्यात येवुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव व ब.नं. नेमणुक | तत्कालीन नेमणुकीचे ठिकाण | वाशिम जिल्हयाचा ब.नं. | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/२२९२ हुसेन चंदु गौरवे | पो.मु.चंद्रपुर | ९९३ | पो.स्टे.मंगरुळपिर |
| २ | पोशि/४१२ श्रीकृष्ण नायडे | पो.सटे.वरोरा जि.चंद्रपुर | ९०४ | पो.स्टे.मंगरुळपिर |

क्रमांक-पोअवा/आशा-४/बि.सं.कर्म/ASI-चिमोटे./विनंती -बदली/कार्यमुक्त/२०१६/१०७२६ वाशिम दि.१९/१२/२०१६ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश क्रमांक ई-३-८ /रेवां/ विनंती बदली /२०१६/४५ पुणे-८ दिनांक १४/०७/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस बिनतारी संदेश विभागातील कर्मचारी यांची उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाचे आस्थापनेवर त्यांनी केलेल्या विनंती नुसार बदली झालेली असल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी या घटकाच्या आस्थापनेवरुन दिनांक ३१/१२/२०१६ चे माध्यान्हानंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांची बदली विनंती नुसार करण्यात आल्याने त्यांना बदलीवर हजर होण्यासाठी पदग्रहण अवधी, स्थानांतर भत्ता तसेच बदली प्रवास भत्ता देय राहणार नाही.

| अ.क्र | कर्मचारी नांव/पदनाम | विनंती नुसार झालेली बदली ठिकाण | |
|---|---|---|---|
| | | कोठुन | कोठे |
| ०१ | सपोउपनि/रेयां श्री.एन.एच.चिमोटे बिनतारी संदेश विभाग वाशिम | पो.अ.कार्यालय वाशिम | पो.अ. कार्यालय अमरावती ग्रामीण. |

२/ पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग वाशिम यांनी सदरचे कर्मचारी यांना दिनांक ३१/१२/२०१६ चे मा.नंतर बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास न चुकता सादर करावा.

क्रमांक - पोअवा/ आशा-४/ बि.सं.कर्म /ASI- विजतंत्री -राणे /पदोन्नती -बदली/ कार्यमुक्त /२०१६ /१०७२५वाशिम दि.१९/१२/२०१६ १) अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश क्रमांक ई-४-८ /रेयां/पदोन्नती पोहवा/सपोउपनि विलं/बदली /२०१६/५४७० पुणे-८ दिनांक ३१/०८/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस बिनतारी संदेश विभागातील कर्मचारी यांची उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयाचे आस्थापनेवर पदोन्नतीवर बदली झालेली असल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी या घटकाच्या आस्थापनेवरुन दिनांक ३१/१२/२०१६ चे माध्यान्हानंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांची बदली पदोन्नती नुसार करण्यात आल्याने त्यांना बदलीवर हजर होण्यासाठी पदग्रहण अवधी, स्थानांतर भत्ता तसेच बदली प्रवास भत्ता देय राहील.

| अ.क्र | कर्मचारी नांव/पदनाम | पदोन्नती नुसार झालेली बदली ठिकाण | |
|---|---|---|---|
| | | कोठुन | कोठे |
| ०१ | सपोउपनि/विजतंत्री श्री.निलसिंग लालसिंग राणे, बिनतारी संदेश विभाग वाशिम. | पो.अ.कार्यालय वाशिम यांचे आस्थापनेवरुन. | मा.संचालक बि.सं.पुणे.यांचे आस्थापनेवर. |

२/ पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग वाशिम यांनी सदरचे कर्मचारी यांना दिनांक ३१/१२/२०१६ चे मा.नंतर बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास न चुकता सादर करावा.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/अॅकब्यु/प्रतिनियुक्ती-हजर/१०७३०/२०१६ वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अन्वये चापोहवा/११५५ संजय बळीराम अंभोरे यांना अॅन्टी करप्शन ब्युरो वाशिम येथुन पोलीस हवालदार पदावर पदोन्नतीवर रुजु होणे कामी कार्यमुक्त केल्याने ते या आस्थापनेवर दिनांक ११/११/२०१६ रोजी हजर होणेकामी आले असता त्यांना हजर करुन नमुद पोलीस हवालदार हे चालक असल्याने त्यांना मोटार परीवहन विभाग वाशिम येथे नेमणुक करण्यात येत आहे.

## पदोन्नती :- निरंक.

## नेमणुक :-

आदेश क्रमांक पोअवा आस्था/फिंगर प्रिंट-वाहन/नेमणुक/१०८३६/२०१६ वाशिम दिनांक २२/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे फिंगर प्रिंटचे वाहनावर चालक पदी नेमणुक होणे बाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव/पदनाम ब.नं. | जा.क्र.दिनांक | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | चापोना/७६७ किशोर जाधव | पोउपअधिक्षक(मुख्या) वाशिम जा.क्र.६३५/१६ दि.८/१०/१६ | मोपवि वाशिम |
| २ | चापोशि/७६१ अतुल शाम कंकाळ | मोपवि जा.क्र.५३०/१६ दि.१०/१०/२०१६ | मोपवि वाशिम |
| ३ | चापोहवा/११५५ संजय बळीराम अंभोरे | नियंत्रण कक्ष जा.क्र.२३८/१६ दि.१५/११/२०१६ | नि.कक्ष वाशिम |

वर नमुद पोलीस कर्मचारी यांचे पैकी एका चालक कर्मचारी यांना जेष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात फिंगर प्रिंटचे वाहनावर देण्या बाबत निर्णय घ्यावे तसा पुर्तता अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

## भाग-२ :- रजा

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/अ.र.रोखीकरण/पो.अधिकारी/२०१६/१०७४५ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे फक्त १५ दिवसाचे रजा रोखीकरण मंजुर करण्यात येत आहे .

| अ.क्र. | अधिकारी नांव | रजेचा तपशिल | मुळवेतन+ग्रेड पे |
|---|---|---|---|
| १ | मपोउपनि कमल शिंदे पो.स्टे.रिसोड | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | ११४५०+४३००/- |
| २ | पोउपनि रवि हुंडेकर पो.स्टे.रिसोड | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १२२०+४३००/- |
| ३ | पोउपनि सुर्यकांत पारटकर पो.स्टे.रिसोड | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १२४२०+४३००/- |
| ४ | सपोनि राहुल आठवले पोस्टे.धनज | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १४७१०+४४००/- |
| ५ | पोनि गजानन गुल्हाने जिवाशा वाशिम | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १९५२०+५०००/- |
| ६ | पोउपनि सचिन ढोके पो.स्टे.आसेगांव | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १२४२०+४३००/- |
| ७ | परीपोउपनि विश्वास वानखेडे पो.स्टे.मानोरा | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १०१००+४३००/- |
| ८ | परीपोउपनि अमोल जाधव पो.स्टे.आसेगांव | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १०१००+४३००/- |
| ९ | सपोनि विनायक जाधव पो.स्टे.आसेगांव | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १३४५०+४४००/- |
| १० | सपोनि प्रतापसिंग बहुरे पो.स्टे.वाशिम शहर | १५ दिवस अर्जित रजा रोखीकरण | १३९९०+४४००/- |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/महाराष्ट्र दर्शन/१३-२०१६/१०४५९ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये खालील नमुद कनिष्ठ श्रेणी लिपीक यांना त्यांचे विनंती नुसार २०१३-२०१६ या गटवर्षाकरीता महाराष्ट्र दर्शन(रजा प्रवास सवलत) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक रप्रस/१९९४/१८४/सेवा-५/दिनांक २८ मार्च १९९५ व दिनांक १०/ जुन २०१५ अन्वये त्यांच्या कुटुंबियांसह त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जाणे-येण्याककरीता दिनांक २२/१२/२०१६ ते २३/१२/२०१६ या दोन दिवसाच्या किरकोळ रजेसोबत दिनांक २४/ व २५ डिसेंबर २०१६ या शासकीय सुटटयास जोडुन महाराष्ट्र दर्शन रजाप्रवास सवलत मंजुर करण्यात येत आहे.

| कर्मचारी नांव हुददा व नेमणुक | कुटुंबातील व्यक्ती नांवे | वय | नाते | प्रवासाचे ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|
| धनश्याम बोरले कनिष्ठ श्रेणी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम. | स्वत: | ३४ | स्वत: | पासुन | पर्यंत |
| | वैशाली धनश्याम बोरले | २९ | पत्नी | वाशिम | गणपती पुळे |
| | रिया धनश्याम बोरले | ०९ | मुलगी | | |
| | श्रेष्ठ धनश्याम बोरले | ०७ | मुलगा | | |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पोउपनि/मोहिते/२०१६२०७४८ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये पोउपनि व्ही.एम.मोहीते नेमणुक बिनतारी संदेश विभाग वाशिम यांना दिनांक २१/१२/२०१६ पासुन १५ दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.त्यांचे रजा कालावधित पोउपनि बी.पी.सोळंके नेमणुक बिनतारी संदेश विभाग वाशिम हे अतिरिक्त कार्यभार पाहतील.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पोउपनि/रामोड/२०१६/१०७४९ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये पोउपनि व्ही.जी.रामोड नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांची कार्यालयीन आदेश क्रमांक पोअवा पशा-१/अ.रजा/पोअधि/२०१६/९१४३ दिनांक २४/१०/२०१६ अन्वये मंजुर असलेली १५ दिवस अर्जित रजा त्यांनी संदर्भिय अर्जान्वये मागणी केल्याप्रमाणे दिनांक २२/१२/२०१६ पासुन १० दिवस उपभोगण्याची परवानगी देण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आली-३/अ.अ.र.रो/से.नि/पोशि-१०४/१०८५३/२०१६ वाशिम दिनांक २४/१२/२०१६ अन्वये वाशिम जिल्हा पोलीस दलामधिल पोशि १०४ शंकर देविदास ओंबासे नेमणुक पो.मु.वाशिम यांना नियत वयोमानानुसार वयाचे ५८ वर्ष पुर्ण झाल्याने या आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांचे रजा खाती ३०० दिवस अर्जित रजा शिल्लक असल्याने त्यांचे अंतिम रजा रोखीकरण करण्याची मंजुरी देण्यात येत आहे.

## भाग-३:- बढती/पगार:-निरंक.

## भाग-४:- बक्षिस:- निरंक.

## भाग-५ शिक्षा/परवानगी :-

## शिक्षा:-

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/२८८+२/२०१६/१०७२२/वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अन्वये कसुरदार पोहेकॉ रमेश वानखेडे ब.नं. २८८ पो.स्टे.मंगरुळपिर, पोकॉ विजय श्रृंगारे ब.नं. ७७० पो.स्टे.वाशिम शहर, पोकॉ खुशाल गाढे ब.नं. १२८२ पो.स्टे.अनसिंग, तुम्ही कसुरदार यांनी दिनांक २५/७/२०१४ रोजी रात्री २०.०० ते ८.०० वा पर्यंत नाईट ड्युटी लावण्यात आली होती आपण ड्युटीवर असतांनाचे आपले कालावधित रात्री सर्व झोपी गेले व सकाळी ६.०० वाजता जागे झाले तुमच्या झोपेच्या कालावधि मध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने स्टेशन डायरी मध्ये असलेला सीसीटीएनएस प्रोग्राम अंतर्गत संगणक संचाला जोडलेला विप्रो कंपनिचा सीपीयु हा चोरुन नेला. परीणामी पो.स्टे.अनसिंग येथे अपनं ८६/२०१४ कलम ३७९ भांदवीचा दि.१६/८/२०१४ रोजी दाखल झाला. वरील दोषारोपात नमुद केलेल्या कसुरी संबंधात दि.२५/२/२०१६ अनुसार विचौ चे आदेश पारीत करण्यात येवुन उपविपोअ वाशिम यांना आदेशीत करण्यात आले होते. सर्व संबंधितांचे जाब जबाब आणि चौकशीचे उपलब्ध कागदपत्रावरुन कसुरदार यांनी कसुरी केल्याचे निष्पन्न झाले होते.नमुद कसुरी वरुन कसुरदार यांना अंतिम आदेशा द्वारे त्यांचे दोषारोपात दर्शविलेल्या कसुरी बद्दल त्यांना देय होणारी वेतनवाढ एक वर्षाचे कालावधीसाठी रोखण्याची शिक्षा कायम करण्यात येत आहे. जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान न झाल्यास व त्यांना नमुद आदेशा विरुध्द अपील अर्ज सादर करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकतात.

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/६१०+२/२०१६/१०८२७/वाशिम दिनांक२२/१२/२०१६ अन्वये कसुरदार पोहेकॉ/६१० संजय गवई, पोना/६३३ अनिल भगत, पोना/६२५ गजमल आगळे नेमणुक पो.मु.वाशिम तुम्ही कसुरदार यांनी पो.स्टे.शिरपुर येथे कार्यरत असतांना कसुरी केली पो.स्टे.शिरपूर येथील अपनं १२०/२०१४ कलम ४५७,३८० भांदवीचे गुन्हयातील आरोपी नामे विरोधी उर्फ विजय पिता फुटबॉल ऊर्फ पिराजी पवार यास सपोनि के.के.खंडारे तथा तपास अधिकारी यांनी नमुद आरोपीस वाशिम जिल्हा कारागृह वर्ग-१ येथुन दिनांक ५/१/२०१५ रोजी ताब्यात घेऊन आरोपीस पो.स्टे.शिरपुर येथे हवालात मध्ये साना नंबर २४ वेळ १८.२० वाजता हवालात बंद केले.नमुद आरोपी हा हवालात मध्ये अटक असतांना दिनांक ६/१/२०१५ रोजी सकाळी ५.३० वाजता चे दरम्यान आरोपी विरोधी उर्फ विजय पिता फुटबॉल ऊर्फ पिराजी पवार यांनी आवाज देऊन त्यांना संडासला घेऊन जा असे म्हटले असता हवालात मध्ये संडासची व्यवस्था नसल्याने गार्ड कर्मचारी पोना अनिल भगत ब.नं.६३३ आणि पोना गजमल आगळे ब.नं. ६२५ यांनी नमुद आरोपीस हवालात मधुन ५.३० वा चे दरम्यान हवालातचे बाहेर काढुन पो.स्टे.चे मागचे भागातील संडासकडे नेतांना त्याने उजवे हाताला लावलेल्या हातकडीतील हात एकदम बाहेर काढुन घेवुन व झटका देवुन अंधारात पळुन गेला. सदर बाबतची माहित्ती ठाणेदार यांना व तपास अधिकारी यांना माहिती देण्यात आली. नमुद आरोपी हा घर फोडीचे चोरीचे गुन्हयात पो.स्टे.चे हवालात मधुन कायदेशीर अटकेत असतांना पळुन गेला परीणामी अशा फिर्यादी वरुन पो.स्टे.शिरपुर येथे आरोपी विरोधी उर्फ विजय पिता फुटबॉल उर्फ पिराजी पवार यांचे विरुध्द अपनंबर ३००१/२०१४ कलम २२४ भांदवीचा गुन्हा दाखल झाला.सदर कसुरीचे अनुषंगाने नमुद कसुरदार यांनी केलेल्या गंभिर कसुरी संबंधात त्यांचे विरुध्दच्या कसुरी बद्दल त्यांना प्रस्तावित विचौ चे आधिन राहुन निलंबित करण्यात आले होते.सदर बाबत कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)पोहेकॉ-६१०/२०१५/५३६ दिनांक १७/१/२०१६ अनुसार निलंबनाचा आदेश पारीत करण्यात आला होता. सदरचे प्रकरणाची विचौ चे आदेश पारीत करण्यात येवुन उपविपोअ कारंजा यांना आदेशीत करण्यात आले होते. सर्व संबंधितांचे जाब जबाब आणि चौकशीचे उपलब्ध कागदपत्रावरुन कसुरदार यांनी कसुरी केल्याचे निष्पन्न झाले होते.नमुद कसुरी वरुन कसुरदार यांना अंतिम आदेशा द्वारे त्यांचे दोषारोपात दर्शविलेल्या कसुरी बद्दल त्यांना देय होणारी वेतनवाढ एक वर्षाचे कालावधीसाठी रोखण्याची शिक्षा कायम करण्यात येत आहे. तसेच त्यांनी निलंबनात व्यतीत केलेला कालावधि हा निलंबन कालावधि म्हणुन जसाचे तसा गणाण्यात येत आहे जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान न झाल्यास व त्यांना नमुद आदेशा विरुध्द अपील अर्ज सादर करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकतात.

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/सपोउपनि ढगे+२/२०१६/१०८२६ वाशिम दिनांक २२/१२/२०१६ अन्वये कसुरदार सपोउपनि दत्तात्रय ढगे-४८२ पो.स्टे. मंगरुळपिर, मपोकॉ सुनंदा गाडे ब.नं.७२२ पो.स्टे.मंगरुळपिर, पोकॉ राहुल जयसिंगकार-८४१ पो.स्टे.मंगरुळपिर, असे कसुरदार पोलीस कर्मचारी यांनी सौ.पुष्पा प्रविण भोयर रा.शेलगांव हिने दि.१५/६/२०१५ रोजी पो.स्टे.ला दिलेला तक्रार अर्ज त्यांचे घरातील कपाटातुन गोपाळ भोयर यांनी रुपये १५०००/- चोरुन

नेले. सदरच्या रिपोर्ट बाबत गांभिर्य न दाखविता कर्तव्यात हलगर्जीपणा करुन सदरचा तक्रार अर्ज गहाळ केला व अशा प्रकारे कर्तव्यात कसुरी केली. नमुद कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बद्दल त्यांना देय होणारी पुढील वेतनवाढ एक वर्षाचे कालावधिसाठी रोखण्याची शिक्षा देण्याचे संबंधात कार्यालयचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/सपोउपनि ढगे+२/२०१६/८७७९ वाशिम दिनांक १०/१०/२०१६ अनुसार नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस ही संबंधित कसुरदार यांना प्राप्त झाली. त्यांनी सदरचे नोटीसचे जबाब सादर केले. सदर जबाबाचे अवलोकन केले असता समाधान कारक आढळुन न आल्याने नोटीसमध्ये देऊ केलेली शिक्षा कायम करण्याचा निर्णय घेतला असुन प्रस्तुत प्रकरणी नमुद कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बददल त्यांना देय होणारी पुढील वेतनवाढ एक वर्षाचे कालावधिसाठी रोखण्याची शिक्षा देण्याचे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे. जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान न झाल्यास व त्यांना नमुद आदेशा विरुध्द अपील अर्ज सादर करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकतात.

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोहेकॉ-२७/२०१६/१०८२८ वाशिम दिनांक २२/१२/२०१६ अन्वये कसुरदार पोहेकॉ/२७ विनोदसिंग शेंगर नेमणुक पो.मु.वाशिम आपण शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात हवालदार पदावर कार्यरत असतांना न शोभनारी अशी कर्तव्यात अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार आणि आक्षेपाहर्य वर्तणुक तथा जनमानसात पोलीसा बददल् दहशत निर्माण करणारे वर्तन की ज्यात तुम्ही कसुरदार यांनी शहापुर येथील घरमालक श्री.लक्ष्मण सिताराम इंगोले रा. शहापुर ता. मंगरुळपिर यांचे घरात जानेवारी २०१२ पासुन किरायाने रहात असुन घरमालकास मागील काही महिण्यापासुन घरभाडे दिले नसल्याने तसेच घरमालकास दिलेल्या त्रासामुळे आणि पोलीस खात्याची दहशत दाखवुन शिवीगाळ केल्याने घरमालक यांनी दिनांक २५/७/२०१६ रोजी तक्रार अर्ज दिला व अशा प्रकारे कसुरदार यांनी केलेल्या गैरशिस्त आणि उध्दटपणाचे व अरेरावी वर्तणामुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली अशा प्रकारे तुम्ही कसुरी केली. नमुद कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बददल त्यांना देय होणारी पुढील वेतनवाढ एक वर्षाचे कालावधिसाठी रोखण्याची शिक्षा देण्याचे संबंधात कार्यालयचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोहेकॉ-२७/२०१६/९१९३ वाशिम दिनांक २४/१०/२०१६ अनुसार नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस ही संबंधित कसुरदार यांना प्राप्त झाली. त्यांनी सदरचे नोटीसचे जबाब सादर केले. सदर जबाबाचे अवलोकन केले असता समाधान कारक आढळुन न आल्याने नोटीसमध्ये देऊ केलेली शिक्षा कायम करण्याचा निर्णय घेतला असुन प्रस्तुत प्रकरणी नमुद कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बददल त्यांना देय होणारी पुढील वार्षीक वेतनवाढ दोन वर्षाचे कालावधिसाठी रोखण्याची शिक्षा देण्याचे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे. जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान न झाल्यास व त्यांना नमुद आदेशा विरुध्द अपील अर्ज सादर करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकतात.

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोकॉ-१७/२०१६/१०८२९ वाशिम दिनांक २२/१२/२०१६ अन्वये कसुरदार पोकॉ-१७ पुरुषोत्तम डिगोलीया नेमणुक पो.स्टे.शिरपुर आपण शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात हवालदार पदावर कार्यरत असतांना न शोभनारी अशी कर्तव्यात अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार आणि आक्षेपाहर्य वर्तणुक तथा जनमानसात पोलीसा बददल् दहशत निर्माण करणारे वर्तन की ज्यात तुम्ही कसुरदार यांनी पो.स्टे.कारंजा येथे कार्यरत असतांना दिनांक ११/५/२००८ रोजी पोकॉ भुपेंद्र ब.नं.३७७ यांचे सोबत २३.०० ते ०५.०० या वेळात नाईट गस्त लावण्यात आली होती परंतु नमुद पोकॉ डयुटीवर न जाता कारंजा लाड येथील रहीवाशी शे.अय्युब शेख कयुम यांचे सोबत दि. १२/५/२००८ चे १.०० ते ०१.३० वाजताचे दरम्यान तपोवन फाटयाजवळ ट्रक क्रमांक सीजी-४ जेएए ४५६५ ला अडवुन ट्रक चालका कडुन चाकुचा धांक दाखवुन रुपये ३०००/- आणि ट्रक क्रमांक एमएचस-११एम ३१५५ चे चालका कडुन रुपये २००/- असे एकुण ३२०० /- चाकुचा धांक दाखवुन जबरीने हिसकावुन घेतले . सदर प्रकरणी आपले विरुध्द पो.स्टे.येथे अपनं ८८/२००८ कलम ३९२,३४ भांदवी चा दाखल झाल्याने अशा प्रकारे कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बददल त्यांना कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/२५-क/पोशि-१७/निलंबन/२००८-८१३२ दिनांक १२/५/२००८ अनुसार निलंबनाचा आदेश पारीत करण्यात आला. कसुरदार यांनी निलंबनात व्यतीत केलेला कालावधि दिनांक १२/५/२००८ ते १३/२/२०१४ पर्यतचा निलंबन कालावधि हा ठरविणे बाकी आहे. असुरदार यांना न्याय निर्णयाचे निकालात नमुद प्रमाणे संशयाचा फायदा आरोपीस जालो बाबत न्यायनिर्णयात नमुद केले आहे. निलंबन कालावधिचे स्वतंत्र आदेश पारीत करण्यात येतील. पोकॉ-१७ पुरुषोत्तम डिगोलीया नेमणुक पो.स्टे.शिरपुर यांनी गैरशिस्त आणि गैरकायदेशिर गुन्हेगारी वृत्तीचे वर्तणासुळे पोलीस दलाची प्रतिमा

जनमानसात मलीन झाली अशा प्रकारे तुम्ही कसुरी केली. या संबंधात कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोकॉ-१७/२०१६/७४३१ वाशिम दिनांक २३/०८/२०१६ अनुसार त्यांनी निलंबनात व्यर्थीत केलेला कालावधि जसाचे तसा का गणण्यात येवु नये म्हणुन कारण दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदरची नोटीस ही संबंधित कसुरदार यांना प्राप्त झाली. त्यांनी सदरचे नोटीसचे जबाब सादर केले. सदर जबाबाचे अवलोकन केले असता समाधान कारक आढळुन न आल्याने नोटीसमध्ये देऊ केलेली शिक्षा कायम करण्याचा निर्णय घेतला असुन प्रस्तुत प्रकरणी नमुद कसुरदार यांनी केलेल्या कसुरी बददल त्यांना देय होणारी पुढील वार्षीक वेतनवाढ तिन वर्षाचे कालावधिसाठी रोखण्याची शिक्षा देण्याचे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे. जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान न झाल्यास व त्यांना नमुद आदेशा विरुध्द अपील अर्ज सादर करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकतात.

## परवानगी :-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/परवानगी-मोटार सायकल/१०७२९/२०१६ वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणुक) नियम १९७९ मधिल पोटनियम क्रमांक १९(२) ते ५ व स्पष्टीकरण क्रमांक ५(२) मधिल अटीचे आधिन राहुन खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार दुचाकी मोटार सायकल/संगणक खरेदीची परवानगी मा. पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे मोटार सायकल अग्रीम / व संगणक अग्रीम मधुन खरेदी करण्याची परवानगी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी नांव, पदनाम ब व ब.नं. | नेमणुक | परवानगी |
|---|---|---|---|
| १ | पोशि/१०८९ माधुरी कळसकर | पो.मु.वाशिम | संगणक |
| २ | मपोशि/१२४२ वर्षा चव्हाण | पो.मु.वाशिम | संगणक |
| ३ | पोशि/१२५२ अविनाश इंगोले | पो.मु.वाशिम | संगणक |
| ४ | पोशि/१२५२ अविनाश इंगोले | पो.मु.वाशिम | मोटार सायकल |
| ५ | पोशि/१२८४ गजानन मुंढे | पो.मु.वाशिम | मोटार सायकल |
| ६ | पोशि/१३२५ सुदर्शन खंडारे | पो.मु.वाशिम | संगणक |

# भाग -६ निलंबन/प्रशिक्षण व इतर

## निलंबन :-

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/गैरहजेरी /पोना-८७३/२०१६/१०६८४ वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अन्वये पोलीस नाईक भगवान भागोराव ढंगारे ब.नं. ८७३ नेमणुक पो.स्टे.मंगरुळपिर आपण दि.२०/९/२०१६ पासुन पो.स्टे.मंगरुळपिर येथुन अनाधिकृतरित्या बेजबाबदारपणे पो.स्टे.ला कोणत्याही प्रकारची सुचना न देता अत्यंत महत्वाचे बंदोबस्त काळात सन उत्सव मोहरम व दुर्गादेवि उत्सव बंदोबस्ताचे वेळी आपले नेमणुकीचे ठिकाणी शासकीय कर्तव्यासाठी तथा उत्सवाचे काळात महत्वाचे बंदोबस्ताचे वेळी कर्तव्यावर उपस्थित राहणे आवश्यक असतांना आपण आपले कर्तव्यावरुन दि.२०/९/२०१६ पासुन कर्तव्य टाळण्याचे दृष्टीने जाणुन बुजुन अनाधिकृतपणे गैरहजर आहेत. आपले या प्रमाणे गैरहजर रहाण्याचे कृत्यामुळे तसेच आपल्या या गैरशिस्तवर्तणुकीचा इतर पोलीस कर्मचारी यांचेवर विपरीत परीणाम होण्याची दाट शक्यता असल्याने आपण केलेल्या कसुरीची गांभिर्यता विचारात घेता तथा गैरहजेरीचे संबंधात प्रस्तावित चौकशीचे आधिन राहुन आपणास मुंबई पोलीस शिक्षा व अपीले-१९५६ च्या नियम ३ चे पोटनियम (१) मधिल (अ-२) च्या तरतुदी नुसारसदरचा आदेश निर्गमीत केल्याचे तारखेपासुन आपणास त्वरीत प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे. निलंबन कालावधित कोणत्याही प्रकारची खाजगी नोकरी अथवा धंदा करता येणार नाही जर त्यांनी अशा प्रकारची खाजगी नोकरी किंवा धंदा केल्याचे आढळयास त्यांची ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ मधिल नियम १६ अन्वये गैरवर्तणुक म्हणुन गणणेत येईल व से शिस्तभंगाचे कार्यवाहीस पात्र राहतील या शिवाय त्यांना देय असलेला निर्वाहभत्ता ते गमावतील.

## प्रशिक्षण :-

क्रमांक:-पोअवा/आशा-४/प्रशिक्षण/INSER-BATCH-NO-४५,४६/नाशिक/निवड-,राखीव-/२०१६/१०८५२ वाशिम दि.:-२४/१२/२०१६अन्वये प्राचार्य/पोलीस अधिक्षक गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक यांचे बिनतारी संदेश क्रमांक -२/गुअप्रके/डीटीकोर्स/से.अ.सत्र क्रं.४५,४६/२०१६ दिनांक २०/१२/२०१६ अन्वये. INSER BATCH NO-"सेवांतर्गत प्रशिक्षण "सत्र क्रमांक-४५"अनैतिक मानवी व्यापार" या विषयावर दिनांक २७/१२/२०१६ ते २८/१२/२०१६"सत्र क्रमांक-४६ " महिला विरुध्द गुन्हयाचा तपास" या विषयावर दिनांक २९/१२/२०१६ ते ३०/१२/२०१६ पावेतो ०४ दिवसाचे गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे INSER BATCH NO-"सेवांतर्गत प्रशिक्षण " सत्र क्रमांक-४५ "अनैतिक मानवी व्यापार" या विषयावर दिनांक २७/१२/२०१६ ते २८/१२/२०१६"सत्र क्रमांक-४६ "महिला विरुध्द गुन्हयाचा तपास"या विषयावर दिनांक २९/१२/२०१६ ते ३०/१२/२०१६ पावेतो ०४ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.सदर प्रशिक्षणा करीता खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.तसेच एक कर्मचारी राखीव ठेवण्यात येत आहे.

१) पोहवा/५३० रमेश प्रतापसिंग आडे पो.स्टे.वाशिम शहर (निवड)
२) नापोकॉ/ ८७५ गजानन कोल्हे पो.स्टे.वाशिम शहर.(राखीव)

वर नमुद सत्रा करीता निवड करण्यात आलेले पोलीस कर्मचारी हे सदरचे प्रशिक्षणास गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नशिक येथे दिनांक २६/१२/२०१६ रोजी सायंकाळी पावेतो न चुकता हजर राहतील. तसेच काही अपरीहार्य कारणास्तव निवड करण्यात आलेल्या कर्मचा-यांस वेळेवर अडचण निर्माण झाल्यास अथवा जावु न शकल्यास राखीव ठेवण्यात आलेले पोलीस कर्मचारी न चुकता प्रशिक्षणास हजर राहतील.

क्रमांक पोअवा/आशा-४/खंडाळा/ MODULE I II III /प्रशिक्षण/निवड-६ कर्मचारी/२०१६./१०८५० वाशिम दिनांक २४/१२/२०१६ अन्वये १) मा.अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रशि/३/सेअप्र/खंडाळा/२०१६/११४६/४७४६दि.०४/११/२०१६. २) प्राचार्य पो.प्र.कें.खंडाळा यांचे पत्र क्रमांक पशा-१/से.प्र./२०१६/६४३४ खंडाळा पुणे दि.२१/१२/२०१६ अन्वये. MODULE I II III 'सेवांतर्गत प्रशिक्षण पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे MODULE I II III' सेवांतर्गत प्रशिक्षण दि.२६/१२/२०१६ ते ३०/१२/२०१६ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणा करीता खालील नमुद पोलीस स्टेशन चे प्रत्येकी ०२ पुरुष पोलीस कर्मचारी यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे. पो.स्टे.कारंजा शहर येथील ०२ कर्मचारी., पो.स्टे.कारंजा ग्रामीण येथील ०२ कर्मचारी., पो.स्टे.मानोरा येथील ०२ कर्मचारी., वर नमुद पो.स्टे.चे अधिकारी यांनी आपले अधिनस्त असलेले पोलीस शिपाई ते सपोउपनि पदापात्रेतोचे ०२ पोलीस कर्मचारी ज्यांची ५ वर्ष सेवा पुर्ण झालेली आहे असे फक्त पुरुष पोलीस कर्मचा-यांची निवड करावी. तसेच निवड करण्यात आलेले नमुद कर्मचारी यांना पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे दिनांक २५/१२/२०१६ चे २०.०० वा पावेतो पोहोचतील या बेताने न चुकता रवाना करुन पुर्तता अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा. तसेच नमुद कर्मचारी न चुकता सदरचे प्रशिक्षणा करीता हजर राहतील.जे कर्मचारी जाण्यास टाळाटाळ करतील त्यांचे कसुरी अहवाल या कार्यालयास सादर करावे.(ज्या कर्मचा-यांची तीन वर्ष सेवा शिल्लक आहे अशा कर्मचा-यांना प्रशिक्षणा करीता पाठवु नये.)

क्रमांक पोअवा/आशा-४/खंडाळा/ MODULE IV/प्रशिक्षण/निवड-२ कर्मचारी/२०१६./१०८५१ वाशिम दिनांक २४/१२/२०१६ अन्वये १) मा.अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक प्रशि/३/सेअप्र/खंडाळा/२०१६/११४६/४७४६दि.०४/११/२०१६. २) प्राचार्य पो.प्र.कें.खंडाळा यांचे पत्र क्रमांक पशा-१/से.प्र./२०१६/६४३४ खंडाळा पुणे दि.२१/१२/२०१६ अन्वये. MODULE IV 'सेवांतर्गत प्रशिक्षण पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे MODULE IV सेवांतर्गत प्रशिक्षण दि.२६/१२/२०१६ ते ३०/१२/२०१६ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणा करीता पोहेकॉ/५७४ दिलीप पवार जिवीशा तसेच नापोकॉ/३०५ पुरुषोत्तम भावनागरे यांची निवड करुन पाठविण्यात येत आहे.

## इतर:-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/प्र.क्र.-१४११/अर्ज चौकशी-राठोड/१०७३१/२०१६ वाशिम दिनांक १९/१२/२०१६ अनवये पोहवा विजय राठोड नेमणुक पो.स्टे.शिरपुर सद्या पो.स्टे.मंगरुळपिर यांचे तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्याने सदरची चौकशी या कार्यालयाचे आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरुळपिर यांचेकडे देण्यात आली होती. त्यांनी चौकशी करुन अहवाल सादर केलेला आहे. सदरचा सुपर्ण मुळ चौकशी अहवाल प्राथमिक चौकशी कामी आपणाकडे वर्ग करण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/३३-क/पो.भ.-२०१६/साक्षांकण/१०७४६/२०१६ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये वाशिम जिल्हा पोलीस दलात सन-२०१६ मध्ये खालील नमुद उमेदवार यांची वाशिम जिल्हा पोलीस दलात अनुकंपा तत्वावर निवड करण्यात आलेली आहे.निवड करण्यात आलेल्या उमेदवार यांचे चारीत्र्य व पुर्वतिहास पडताळणी (साक्षांकन नमुना) फॉर्म सोबत जोडुन त्यांचे चारीत्र्य व पुर्वतिहास पडताळणी करणेकामी आपणाकडे पाठविण्यात आलेले आहे. परंतु अद्याप पर्यंत सदर उमेदवार यांचे चारीत्र पडताळणी चे अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | संपुर्ण पत्ता | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.राहुल पंजाबराव गवई | रा.मु.पो.मिलींद नगर, पातुर ता.पातुर,जि.अकोला. | ७७४१८४१६४२ |

२/- करीता वर नमुद उमेदवार यांचे चारीत्र्य पडताळणी करुन त्यांचे सोबत जोडलेल्या साक्षांकन नमुना फॉर्म सोबत या कार्यालयास त्वरीत पाठविणेस विनंती आहे. जेणेकरुन नमुद उमेदवार यांचे पोलीस शिपाई पदी नियुक्ती बाबत निर्णय घेणे सोईचे होईल.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था-३३क/परी स्त.से.प्रशि/१०७६५/२०१६ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये दिनांक १३/१२/२०१६ ते १४/१२/२०१६ रोजी या आस्थापनेवर हददपार प्रकरणांची कार्यपध्दती या विषयावरील परीक्षेत्रीय स्तरावर सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजील करण्यात येत आहे.सदर प्रशिक्षणा करीता उपस्थित अधिकारी यांना त्यांची राहण्याची व्यवस्था चहा व जेवणाकरीता सेवांतर्गत प्रशिक्षण खात्यामध्ये जमा असलेली रक्कम सेवांतर्गत प्रशिक्षण निधी मधुन (२८-Professiona; service) रुपये १५,०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) मंजुर करण्यात येत आहे. सदरची रक्कम त्वरील पोलीस निरीक्षक कल्याण शाखा वाशिम यांना सदर प्रशिक्षणा करीता अदा करण्यात यावे.

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/से.कर्म/पेंशन सेवापट/१०७५२/२०१६ वाशिम दिनांक २०/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या आस्थापनेवरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचे मुळ सेवापट पेंशन प्रकरण तयार करण्याकामी आपणाकडे या सोबत जोडुन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचारी नांव | नेमणुक | जन्मतारीख | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि | ३९४ | जयराम गोरबाजी पंचबुध्दे | पो.मु.वाशिम | ११/५/१९५९ | ३१/५/२०१७ |
| २ | सपोउपनि | ४८६ | शेख मोहंमद शेख सुलतान | पो.स्टे.मंगरुळपिर | १५/५/१९५९ | ३१/५/२०१७ |
| ३ | सपोउपनि | १२० | प्रकाश शंकर अहिर | पो.मु.वाशिम | ०१/०७/१९५९ | ३१/६/२०१७ |
| ४ | सपोउपनि | ४०३ | रमेश विष्णु भगत | पो.स्टे.मंगरुळपिर | ०१/०७/१९५९ | ३१/६/२०१७ |
| ५ | सपोउपनि | ४२४ | सैय्यद सखावत सैय्यद शौकत | पो.स्टे.मालेगांव | ०१/०७/१९५९ | ३१/६/२०१७ |

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/पुर्नविलोकन/१०७७६/२०१६ वाशिम दिनांक २१/१२/२०१६ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी हे वयाचे ५५ वर्ष व सेवेत ३० वर्ष पुर्ण करीत असल्याने त्यांचे वैद्यकीय तपासणी करीता जिल्हा शल्यचिकीत्सक सामान्य रुग्नालय वाशिम यांचेकडे दिनांक ३/१२/२०१६ ते दि.६/१२/२०१६ पावेतो न चुकता पाठविण्यात यावे. तसेच नमुद कर्मचारी यांना वैद्यकीय तपासणी करीता पाठवुन अहवाल दि.६/१२/२०१६ व दि.१३/१२/२०१६ पर्यंत वैद्यकीय तपासणी अहवाल या कार्यालयास सादर करण्या बाबत कळविण्यात आले होते. परंतु अद्याप पावेतो खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले नाही. दि.२२/१२/२०१६ रोजी पुर्नविलोकन करण्या करीता मा. अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांचे अध्यक्षतेखाली दि.२२/१२/२०१६ रोजीचे सकाळी ११.०० वाजता समितीची बैठक आयोजीत करण्यात आलेली आहे. नमुद कर्मचारी यांना त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र घेवुन दि.२२/१२/२०१६ रोजीचे

सकाळी १०.०० वाजता या कार्यालयास न चुकता हजर राहण्या बाबत लेखी समज देवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | कर्मचारी नांव | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ASI | ४९ | सिध्दार्थ प्रल्हाद सिरसाट | अमानि |
| २ | HC | ५७ | विश्वनाथ नथुजी साखळकर | शिरपुर |
| ३ | NPC | ७२ | तेजराव त्र्यंबकराव धामोडे | जिवीशा |
| ४ | HC | ७५ | अशोक शालीकराम आमले | पो.मु.वाशिम |
| ५ | HC | १३२ | विजय बळीराम वानखेडे | रिसोड |
| ६ | ASI | २७५ | भगवान झींगराजी तावडे | पो.मु.वाशिम |
| ७ | HC | ३३३ | मधुकर विठोबा अवगळे | रिसोड |
| ८ | ASI | ३८६ | मो.शमीम मो.अख्तर | नि.कक्ष वाशिम |
| ९ | ASI | ४३१ | जनार्धन नारायण गि-हे | रिसोड |
| १० | ASI | ६१५ | शाम देविलाल शर्मा | वाशिम शहर |
| ११ | HC | ८८६ | सुधाकर गुलाबराव पवार | कारंजा शहर |
| १२ | HC | ८९६ | अशोक दाजीबा इंगोले | पो.मु.वाशिम |
| १३ | HC | ९२३ | मोबीन अहमद अब्दुल खान | पो.मु.वाशिम |
| १४ | ASI | २५८ | मो.खालेद मो.शरीफ | शिरपुर |
| १५ | ASI | ४४६ | गजानन तुकाराम दिसले | कारंजा शहर |
| १६ | ASI | ४४८ | शांताराम पंडीत पाटील | पो.स्टे.मानोरा |
| १७ | ASI | ४४९ | प्रकाश वामनराव इंगळे | धनज |
| १८ | ASI | ४६७ | शेषराव भिमराव डाबेराव | आसेगांव |

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/प्र.क्र.१५३८/कर्मचारी-मदतनिस/१०८३५/२०१६ वाशिम दिनांक २२/१२/२०१६ अन्वये पोलीस उपअधिक्षक(गृह) कार्यालयात अर्ज चौकशी ,प्रा.चौ.,वि.चौकशी चे कामकाज करण्यासाठी पोहवा/६९० शिवदास मन्नुसिंग चव्हाण नेमणुक पोलीस मुख्यालय वाशिम यांना ड्युटी करीता मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचे वार्षीक निरीक्षण होईपर्यंत देण्यात येत आहे.

(प्रशांत होळकर)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीक यांना योग्य कार्यवाहीस.

******************